ऐच्छिक सेवानिवृत्ती बाबत.
श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले,

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग १
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-२/३४३२९३४/३५६ /२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरीखाली नमूद प्रमाणे

वाचा:- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा.क्र साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र.अस्था-१/१७७६/२०२६ दि.१६.०७.२०२६
३. श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील विनंती अर्ज दिनांक २२.०६.२०२६
४. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६

ज्याअर्थी श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांनी दिनांक २२.०६.२०२६ च्या अर्जान्वये ऐच्छिक सेवानिवृत्ती करणेबाबत विनंती केलेली आहे.

संबंधित कार्यालय प्रमुखांनी श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांचे विरुध्द कोणतीही चौकशी चालु नाही अथवा प्रस्तावित नाही असे दाखले सादर केले आहे. नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकरण आहेत.

त्याअर्थी संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ अन्वये श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची दिनांक ३०.०९.२०२६ रोजी मध्यान्होत्तर ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूर करीत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 20260814040144 असा आहे.

Digitally signed by
Rahul Ashok Shelke
Date: 14-08-2026
12:45:19

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती अकोले
द्वारा व प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.

२/- सोबत आदेशाच्या दोन प्रती पाठविलेल्या आहेत. संबंधीतास एक प्रत बजावुन दुस-या प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. श्री. सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, यांना दिनांक - ३०.०९.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर स्वेच्छा सेवानिवृत्त करणेकामी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच सेवानिवृत्त प्रकरणांची त्वरीत पुर्तता करावी.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर